MHKO110018012022

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ८७६/२०२२.**

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगांव यांचे न्यायालयात

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | - | १२/०५/२०२२. |
| २. | फिर्याद दाखल झाल्याची तारीख | - | १२/०५/२०२२. |
| ३. | फियादीचे नाव व पत्ता | - | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>कामगार अधिकारी, कोल्हापूर |
| ४. | आरोपीचे नाव व पत्ता | - १. | प्रियदर्शनी पॉलिसॅक्स लि.<br>युनिट-२, प्लॉट नं. १५, एमआयडीसी<br>शिरोली, ता. हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर |
| | | २. | नेमचंद चंदनमल संघवी,<br>व.व.- ६०, धंदा - कार्यकारी संचालक,<br>रा. श्वेता अपार्टमेंट, ताराबाई पार्क,<br>कोल्हापूर |
| ५. | आरोपीत गुन्हा | - | वेतन प्रदान अधिनियम १९३६ व<br>महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ |

दिनांक १२/०५/२०२२ रोजी तुम्ही प्रियदर्शनी पॉलिसॅक्स लि.युनिट-२, प्लॉट नं. १५, एमआयडीसी शिरोली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर चालवत असताना नियम ८, नियम २०(२), कलम १३(अ) च्या तरतुदींचे उल्लंघन करताना मिळून आल्याने तुम्ही वेतन प्रदान अधिनियम १९३६ व महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ चे कलम २० अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे असा तुमच्यावर आरोप आहे.

६. आरोपींचा जबाब -

प्रश्न क्र.१ - तुम्हाला फिर्यादची प्रत मिळाली का ?

उत्तर - होय.

प्रश्न क्र.२ - तुम्हाला आरोप वाचून दाखविण्यात आले ते समजले का ?
उत्तर - होय.

प्रश्न क्र.३ - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर - मला गुन्हा कबूल आहे.

१.

२.

**आरोपीची सही** समक्ष,

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.03.16 11:05:51 +0530

**( जे. एन. भस्मे. )**

**दिनांक - १४/०३/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगांव**

आरोपींनी स्वतः अर्ज देवून वेतन प्रदान अधिनियम १९३६ व महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ चे कलम २० प्रमाणे गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. सरकारी वकिलांचे तसेच आरोपींचे म्हणणे ऐकले. सदरचा गुन्हा हा आरोपींचे हातून पहिल्यांदाच घडलेला असून त्याने कमीत कमी शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. गुन्ह्याचे स्वरुप तसेच आरोपींचे कबुलीचे कथन यांचा विचार करता आरोपींना द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश.**

१. आरोपी क्र. १ व २ यांना यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये वेतन प्रदान अधिनियम १९३६ व महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ चे कलम २० अंतर्गत दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीने वेतन प्रदान अधिनियम १९३६ व महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ चे कलम २० गुन्हयासाठी प्रत्येकी रक्कम रु. ३०००/- (रुपये तीन हजार मात्र) द्रव्यदंड भरावा. दंड न भरलेस आरोपींना ५(पाच) दिवसांची साधी कैद सुनावण्यात येत आहे.

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.03.16 11:05:55 +0530

**पेठ वडगांव** **(जे. एन. भस्मे. )**

**दि. १४/०३/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगांव**